- वर्ष: ८ वे
- अंक: ८ वा
- ऑगस्ट २०२२
- किंमत: ४० रूपये

मासिक

# शिक्षणयात्री

75

## अमृत महोत्सव





योगेश्वरी विनोदराव पाठक
भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी जि.प.
आंतरराष्ट्रीय शाळा माळी वाडा पाथरी
जि.परभणी ४२१५०६ मो.८८८८४७१३०७

प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आयुष्यात दररोज कोणती ना कोणती संधी येत असते.त्या संधीला आपण आत घ्यायचे का दार बंदच ठेवायचं हे ज्याचं त्यानं ठरवायला पाहिजे.मलाही माझ्या शाळेतील मुख्या चिंचाणे सरांनी सुरुवातीला गीत गायनाची नंतर भाषणाची संधी दिली.

आमच्या शाळेतील खरात सरांनी माझ्या लेखन शैलीचा विचार करुन मला कविता करण्यास प्रवृत्त केले.सुरुवातीला मी चार चार ओळीच्या कविता करु लागले पण जस जसे मी त्याकडे पूर्ण लक्ष दिले. लता दिदीवर कविता केलेली मी आईला म्हणून दाखवली.नंतर ती कविता आईनी लिहून काढली.

अशा प्रकारच्या अनेक लहान लहान कविता मी केल्या आहेत.तसेच बडबडगीते,शाळा,युक्रेन-रशिया युध्द ,मराठी भाषा,पेट्रोल-डिझेल भाववाढ, कोरोना,राजकारण अशा अनेक विषयांवरील कविता मी सांगते.आई लिहते

माझ्या या कविता कुठेतरी छापून यायला हव्या असे वाटत होते.त्यातच आईने शाळेच्या ग्रुपवर आलेला मेसेज वाचून दाखवला आणि मी लगेच आईला सांगितलं की,शिक्षणयात्री मासिकात देण्यासाठी माझ्या काही कविता तू वेगळीकडे लिहून दे. तशी माझी आई देखील तयार झाली.

शिक्षणयात्री मासिकाने माझ्या लेखनाला प्रकाशित करुन मला प्रोत्साहीत करावे ही विनंती.

योगेश्वरी विनोदराव पाठक

वरील पत्र आपण वाचले.योगेश्वरी विनोदराव पाठक भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी जि.प.आंतरराष्ट्रीय शाळा माळीवाडा-पाथरी जि.परभणी या शाळेची इयत्ता ६ वी ची विद्यार्थीनी.वयाच्या बारा-तेराव्या वर्षात लेखनाचा प्रयत्न करते.कविता लिहते.कथा लिहते. योगेश्वरी दोन्ही डोळ्यांनी अंध आहे हे विशेष.

योगेश्वरीला सुचलेल्या ओळी,वाक्ये आईला सांगते आणि आई लिहून काढते.आपल्या अंध मुलीचा आईला अभिमान आहे.गर्व आहे. आई तिचे लेखन युट्युब,व्हॉटसप ॲप वर पाठवून तिला प्रोत्साहन देते.

आपल्या लेखनाची दखल शिक्षणयात्री मासिक नक्कीच घेईल या विश्वासान योगेश्वरीनं पत्र पाठवलं आणि आपलं लेखन प्रकाशित करण्याची विनंती केली.म्हणूनच या अंकात तिच्या लेखनाला मुख्यपृष्ठसह आतल्या पानावर घेऊन दाद दिली आहे. वाचकांनीसुध्दा पत्र पाठवून,फोनवरुन योगेश्वरीच्या लेखनाचे कौतुक करुन तिला प्रोत्साहित करायला हवे.

**आठवण मंतरलेल्या दिवसांची**
शांताराम गिरासे/जयराज जैन/उखा ठाकरे
आशाताई रंधे/३

**व्यंकटराव तानाजी धोबी (रणधीर)**
सारिका रंधे/७

**संस्कारांच्या कोंदणातील सेवाव्रती!**
विनोद पावरा/९

**केल्याने होत आहे रे...**
एस.पी.भांगरे/१२

**रुजवा डोळस जाणिवांचा**
युवराज माने/१५

**बालपणीतील शाळा**
सुकेंद्र वळवी/१८

**तारारुपी नाकाची चिचुंद्री**
नंदा हरम/२१

**माझी शाळा माझे उपक्रम**
शोभा माने/२४

**करुया नित्य व्यायाम**
प्रतिभा बारी/२५

**ZERO DROPOUT MISSION**
प्रकाश गावीत/मंजुषा आचमे/ज्वाला मोरे
सरदार पावरा/राहुल मोरे/सचिनकुमार पंचभाई/२६

# अंतरंग

समृद्ध शिक्षण संस्कारासाठी ...

मासिक **शिक्षणयात्री**

।। ज्ञानम् सर्वजण हिताय ।।

वर्ष : ७ वे अंक: ८ वा ऑगस्ट २०२२

**वार्षिक:रू.४००/-** **द्वैवार्षिक:रू.७००/-** **त्रैवार्षिक:रू.१०००/-**

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.
**Online** पेमेंट साठी - खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri
बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No.13320200000322
IFSC Code : BARB0SHIRPU
वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे

संपर्क पत्ता-
संपादक शिक्षण यात्री
शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका,मु.पो.ता.-शिरपूर जि-धुळे ४२५४०५
(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

मार्गदर्शक
मा.पुरूषोत्तम भापकर (भाप्रसे)
मानद संपादक
सुभाषदादा कुलकर्णी
उप संपादक
संदेश नंदकिशोर हजारे
संपादन सहाय्य
डॉ.दिपक बाविस्कर
डॉ.युवराज पवार
अंक जुळणी
प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे
मुद्रितशोधन
डॉ.युवराज पवार
मुखपृष्ठ
साभार आंतरजाल
कार्यालय प्रमुख
जगदीश पाटील

लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत.

संवाद

# अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिन...



*सुभाषदादा कुलकर्णी*
*संपादक*

देशावासीय अनेक आपत्तींना सामोरे जात असतांन स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सव मोठ्या थाटात आपण साजरा करीत आहोत.या निमित्ताने गेल्या वर्षभरात आपण अनेक उपक्रम राबवले.आणि शेवटचा उपक्रम म्हणजे घर घर तिरंगा.या उपक्रमामागील भावना म्हणजे त्या तिरंग्याचे महात्म्य त्यासोबत स्वातंत्र्याचे महात्म्य घराघरापर्यंत पोहचवणे आहे.

हा अमृत महोत्सव साजरा करतांना आपण आनंदीत आहोत.पण त्यामागे लाखो लोकांचे बलिदान,कोट्यावधी लोकांचे श्रम आणि यातना दडल्या आहेत.स्वातंत्र्याचा तो काळ मंतरलेला होता.स्वातंत्र्याच्या चळवळीत आपणहून भाग घेणाऱ्या तरुणांची एक पिढी आज काळाच्या पडद्याआड गेली आहे.स्वातंत्र्य सैनिक देशात बोटावर मोजण्या इतके जिवंत आहेत.हे स्वातंत्र्य सहजा सहजी मिळाले नाही. पण अभिमानाने सांगावेसे वाटते कि ते मिळालेले स्वातंत्र्य अहिंसेच्या मार्गाने मिळाले आहे.मूठभर मीठ उचलून स्वातंत्र्याचा पाया हलवून सोडणारे गांधीजी,लढत लढत फाशीवर जाणारे भगतसिंग, स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे अशी सिंहगर्जना करणारे लोकमान्य ,नवभारताचे स्वप्न पाहणारे नेहरुजी अशी कितीतरी मंडळी ध्येयवादाने पछाडली होती.आपण कधी मंत्री प्रधानमंत्री होऊ,आमदार खासदार होऊ अशी कुठलीच मनिषा त्या लोकात नव्हती.फक्त स्वातंत्र्य मिळाले पाहिजे त्यासाठीच ही माणसे झटत होती.

देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करतांना त्या आनंदासोबतच काही गोष्टीचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे.आज देशात विचारापेक्षा स्वार्थासाठी चाललेली राजकीय रस्सीखेच या स्वातंत्र्याला बाधा आणणारी ठरु शकते.अगोदर देश मोठा, मग राजकीय पक्ष नंतर व्यक्ती ! परंतु दुर्देवाने उलट परिस्थिती आहे आपला नेता मोठा,पक्ष मोठा नंतर देश! अशी भावना म्हणजे स्वातंत्र्यासाठी आहूती देणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांची आपण उडवलेली टिंगल आहे.स्वराज्याचे सुराज्य करणे हे आजच्या घडीला युवकांचे, प्रत्येक नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे.

पूर्वीच्या काळात पहिले पंचवीस तीस वर्षे स्वातंत्र्य दिवस घराघरात गोडधोड खाऊन सणासारखा साजरा करीत. आज स्वातंत्र्य दिनी वन डे टूर आयोजित करण्याचा दिवस म्हणून पाळला जातो.यानिमित्ताने वर्षभर झालेले कार्यक्रम याही पुढल्या काळात स्वातंत्र्याचा मंत्र तरुण पिढीच्या मनात सजण्यासाठी केले जावेत म्हणजे अमृत महोत्सव सार्थ ठरेल.जाती जाती मध्ये तेढ, धर्मांधता, गरिब श्रीमंतांमधील वाढती दरी हे सर्व थांबवायचे असेल तर स्वातंत्र्याचा इतिहास पून्हा एकदा तरुणापावेतो पोहचवले गरजेचे आहे. म्हणजे पुन्हा शंबर वर्षे हे स्वातंत्र्याचे अमृत असेच पाझरत राहून देशातील तरुणांना देशप्रेमाची संजीवनी देणारे ठरावे हीच याप्रसंगी प्रार्थना..!

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# मंतरलेल्या दिवसांची आठवण !



**शांताराम दौलत गिरासे**
शिरपूर-धुळे

देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणजेच पंच्याहत्तरी साजरा करतोय आणि मी नव्वदीच्या उंबरठ्यावर! या नव्वद वर्षांचा पिक्चर डोळ्यासमोर आणला तर पारतंत्र्याच्या काळातील मंतरलेल्या दिवसांची विशेष आठवण मन:पटलावर कायम राहिल्याचे जाणवते.स्वातंत्र्य मिळवण्यासाठी झिजलेल्या काळाचा साक्षीदार असल्याचा अभिमानही वाटतो.

१५ ऑगस्ट १९३३ साली माझा जन्म शेतकरी कुटूंबात झाला. दौलत वैद्य या नावाने आज ओळख असलेल्या वडिलांच्या पोटी आम्ही सात भाऊ नि चार बहिणी अशी एकूण अकरा भावंड होतो.मी जूनी अकरावी पावेतो शिकलेलो.बालपणी नगरपालिकेच्या शाळा नं.२ मध्ये प्राथमिक शिक्षण घेतलेले. पारतंत्र्याचा काळ होता.भारत माता कि जय बोलणे हा गुन्हा समजला जाई.पोलीसांना तर सारेच जण भिऊन रहात.नुसत्या ब्रिटीशांच्या जीप गाड्या आल्या तरी रस्त्यातील लोक भिऊन लपत असत.एकदा शाळेत जात असतांना ब्रिटीश (गोरे) लोक गाडीने जात होते.आणि आनंदाने आरोळ्या मारत व्ही.आकाराचे बोट करुन आम्हाला दाखवत होते.आम्ही देखील दोन बोटांनी व्ही.करुन दाखवले.त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता.नंतर कळाले की,तो आनंद पहिल्या का दुसऱ्या महायुध्दाचा विजयाचा होता.मला राष्ट्रसेवा दलाची आवड होती.राष्ट्र सेवा दलाच्या बैठकांना,शिबीरांना मी लहानपणापासून जात असे.तेथे स्वातंत्र्याचे बौध्दीक मिळायचे.चर्चा व्हायच्या.एकदा शिबीराला साने गुरुजी आल्याचे आठवते.पंधरा ऑगस्ट सत्तेचाळीसला स्वातंत्र्य मिळाले .मी साधारण चौदा वर्षाचा होतो.घरोघरी पणत्या लावल्या होत्या.गोडधोड जेवण केल्याचे आठवते.आम्ही मुले तर दिवसभर वंदेमातरम् भारत माता की जय घोषणा देत फिरलो होतो.मामलेदार कचेरी येथे तिरंगा डौलाने फडकत होता.एक आठवण सांगाविशी वाटते.चाळीस सालची असावी. आम्ही लहान भावंडे उंदीर नाला (ओढा) येथे गुडघाभर पाण्यात मजा करत होतो.ओढा चांगला वाहत होता.तेव्हा दोन गोरे लोक गाडीतून आले. त्यांना पाहून आम्ही घाबरुन पळालो.दुरुन त्यांची गंमत पाहू लागलो.त्या दोन्ही गोऱ्यांनी अंगावरचे संपूर्ण कपडे काढून पाण्यात उड्या मारल्या.गोऱ्या कातडीच्या लोकांना पाहून आम्ही खूप हसलो होतो.त्याकाळी दत्त टाकी (थिएटर) एकच होते.पिक्चर सुरु करण्याआधी पाच दहा मिनिटे ट्रेलर दाखवायचे.त्या ट्रेलरमध्ये देशाची होत असलेली प्रगती (कारखाने,रस्ते,रेल्वे) दाखवून मान्यवरांचा संदेश दाखवत असत.१९५४ साली देशाचे पंतप्रधान पंडित नेहरु धुळ्यात येणार असल्याची बातमी आमच्यापावेतो पोहचली.अनेक लोक नेहरुंना पाहण्यासाठी निघाले.आम्ही दोघे भाऊ साठ किलोमीटर अंतरापैकी तीस किमी अंतर पायी (शिरपूर ते नरडाणे) तर पुढे एसटीने धुळ्याला पोहचलो.आणि पांझरा किनारी असलेल्या सभास्थळी पंडित नेहरुंना पाहून मन सुखावले होते.

-९९२३००९०१८

# मंतरलेल्या दिवसांची आठवण !



जयराज कल्याणचंद जैन
शिरपूर-धुळे

माझा जन्म ५ मे १९४० चा.भारत स्वतंत्र झाला त्यावेळी मी दुसरीत असेन.नगरपालिकेच्या शाळा नं.१ या शाळेत होतो. चार खोल्या तळमजल्यावर,तर चार खोल्या वरच्या मजल्यावर होत्या.शाळेच्या पटांगणात मोठे वडाचे झाड होते. आणि झाडा शेजारीच झेंडावंदनासाठी लोखंडी पाईप होता. त्या पाईप ला धरुन गोलाकार फिरण्यात आम्हां मुलांना खुप मजा यायची.

सत्तेचाळीस ला भारत स्वतंत्र झाला त्यावेळी मी सात वर्षांचा होतो. ते दिवस आठवत नसले तरी त्यापुढील काळात प्रत्येक स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा केला.तिरंग्या कडे पाहिले की वेगळीच उर्जा शरीरात निर्माण होत असे. आमच्या शाळेत स्वातंत्र्य मिळल्यानंतर सर्वत्र उत्साहाचे वातावरण असायचे. आम्ही सारी मुले शाळेची पुर्ण साफ सफाई करायचो.झेंडाभोवती शेणाने सारवायचो. रांगोळ्या काढल्या जायच्या. झेंडावंदन झाल्यावर काही तरी गोड खायला मिळेल अशी आशा असायची. आणि एखादा नागरिक उत्स्फुर्तपणे येऊन लिमलेटच्या गोळ्या द्यायचे.आमच्या घरी गोडधोड जेवण केल्याचे आठवतो. शाळेत खाकी हाफ पॅन्ट,पांढरा शर्ट स्वच्छ धुवून घडी घालून गादीखाली ठेवला होता. सकाळी झेंडावंदन झाल्यानंतर खास म्हणून बिस्कीटे वाटली होती.मजा वाटत होती.नंतर आमच्या मुलांची गावभर मिरवूणक निघाली होती.शेवटी मामलेदार कचेरी समोर ध्वजस्तंभावर तिरंगा झेंड्याला अभिवादन केले होते.

१९४८ ला महात्मा गांधी वारले. तेव्हा संपूर्ण गावात शांत,स्तब्ध वातावरण होते.शिरपूरातील सर्वच लोक पणती,दिवा घेऊन अरुणावती नदी काठावर आले होते.गर्दी खूप होती.मी वडिलांबरोबर होतो.कुणाचाही आवाज नव्हता.सर्वजण शांततेत हातात दिवे घेऊन नदीकडे निघाले.तेथे श्रध्दांजली दिल्याचे आठवते.

साल आठवत नाही. मात्र मी पुढील शिक्षणासाठी अमळनेर जि.जळगांव येथील प्रताप विद्या मंदिरात दाखल झालो होतो.तेव्हा डॉ.राधाकृष्ण यांनी काही निमित्ताने प्रताप विद्यामंदिराला भेट दिल्याचे आठवते.त्या वेळी आम्हा मुलांनी स्वागतासाठी शाळा खूप सजवली होती.

-९४२१३०१९२९

# मंतरलेल्या दिवसांची आठवण !



उखा बंडू ठाकरे
शिरपूर-धुळे

एकदा पंडित नेहरु धुळे येथे आले होते.त्यांची धुळ्यात सभा असेल कदाचित त्याचा परतीचा मार्ग आमच्या शिरुड ता.जि.धुळे गावाजवळून जात होता.पंडित नेहरु चाळीसगावला जाणार,हे कळाल्याने पंचक्रोशीतील सारेजण पंडित नेहरुंना पाहण्यास उत्सुकतेने शिरुड चौफुलीला आले होते.आम्हा शाळकरी मुलांना गुरुजींनी बैलगाडीवर बसवून आणले.साधारण चार वाजेची वेळ असावी.पंडित नेहरु आले.त्यांचेसोबत लहानगी इंदिरा पण होती.रुबाबदार व्यक्तिमत्वाच्या पंडित नेहरुना पहाण्यासाठी जो तो टाचा उंचावून उभा होता. बैलगाडीवर बसलेला. असल्याने पंडित नेहरुंना पाहता आले.नेहरुंनी छोटेखानी सभा घेतली होती.

माझे गाव शिरुड (ता.जि.धुळे) गाव तसे लहानच.गावाजवळून बोरी नदी व मांदूर नदी वाहते. नदीच्या संगमाजवळ आमचे गाव.शाळेच्या दोन इमारती होत्या एक गावात तर दुसरी नंदी जवळ माझा जन्म २५/०६/१९३६ चा घरची गरिबीची परिस्थिती जास्त शिक्षण झाले नाही. मात्र पहिले ते चौथी गावातल्या शाळेतच होतो.कोळी गुरुजी व पाटील गुरुंजी आठवतात.कोळी गुरुजी हाडाचे शिक्षक सज्जन माणूस,रोज रात्री आम्हा मुलांना शाळेत बोलवायचे अभ्यास घेवून तेथेच झोपवायचे पहाटे उठून व्यायामाबरोबर मल्लखांब शिकवायचे.

स्वातंत्र्यदिन पुसटसा आठवतो. सर्वत्र जल्लोष होता.मात्र त्या दिवसात आमच्या गावाला स्वातंत्र्यसैनिक डॉ.उत्तमराव पाटील व क्रांतीवीरांगणा लिलाताई पाटील आले होते. बैलगाडीतून मिरवणूक निघाली होती. एका बैलगाड्यावर बाकडे ठेवून त्याला सजवण्यात आले.भारदस्त उत्तमराव व प्रसन्न व्यक्तिमत्वच्या लिलाताई यांची सभा झाली होती.वंदेमातरम भारत माता की जय या घोषणांनी आम्ही लहान मुले बैलगाड्यांच्या सोबतच गावभर फिरत होतो.

भुदान चळवळी प्रणेते विनोबा भावेंना सुध्दा मी पहिले होते.त्यांच्यासोबत खूप गर्दी होती. आणि उंच सडपातळ,छोटीशी दाढी असलेले विनोबा भावे झपझप चालत होते.

-९४२२७८८६५९

# मंतरलेल्या दिवसांची आठवण !



आशाताई रंधे
शिरपूर-धुळे

माझा जन्म १९५५ सालचा परतवाडा जिल्हा अमरावती हे आमचं गांव घरची फारच साधारण परिस्थिती. हाता तोंडाची मिळवणी करण्याकरीता फारच कष्ट पुरे.शिक्षणही परतवाड्यालाच झाले.नगरपालिकेच्या कौलारु शाळेत पहिली ते चौथी पर्यंत शिक्षण घेतले.

मला चौथींला असतांनाचा स्वातंत्र्यदिना आठवतो.आम्हाला शाळेत विचूंरकर बाई होत्या.झेंडा फडकावयाचा आहे,१५ तारखेला स्वातंत्र्य दिन आहे.

सर्वांनी गणवेशात यायचं. मुलींनी वेण्या घालून यायच्या अशा सुचना बाई सारख देत होत्या. पंधरा च्या आदल्या दिवशी शाळेचा गणवेश आईने स्वच्छ धुतला होता.आणि घडी घालून अंथरुणाखाली ठेवला होता.पहाटेच उठवले.घरात साऱ्यांचीच लगबग होती. छानपैकी दोन वेण्या घालून मला शाळेत पाठवले होते.

शाळेत ध्वाजरोहण कुणी केले ते आठवत नाही. आम्ही मुले फार उत्साहात होतो.गावातून प्रभारफेरी झाली होती.वंदेमातरमच्या घोषणा दिल्या जात होत्या.कार्यक्रम झाल्यानंतर शाळेसमोर सिंधी समाजाच्या बंधूचे दुकाने होते त्यांनी सर्व मुलांना गोड खाऊ दिला होता.नंतर दरवर्षी ते मुलांना खाऊ वाटायचे.

त्यानंतर आम्हा मुलांना चित्रपट पहायची संधी मिळायची परतवाड्यात दोन पिक्चर टाकी होत्या.शाम टाकी आणि लक्ष्मी टाकी.१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन झाला कि नंतर शाम टाकीत सर्व मुले जायचो देशभक्ती पर चित्रपट दाखवला जायचा.माझ्या भावाचे टाकी समोर इस्तरीचे दुकान होते.मी पिक्चर सुटल्यावरही तेथेच थांबायचे.

नवीन गणवेश घेण्यासाठी आम्हां भावंडाना ऑगस्ट मुहूर्त असायचा.

माझे पंधरा वारकरी पंथाचे होते.महात्मा गांधीजीच्या पदयात्रेत आईने सहभाग घेऊन परतवाडा ते अचलपूर पायी प्रवास केला होता.असं आई नेहमी सांगून देशाभिमान जागृत करित असे.

-९८८१२६४११०

शिक्षणयात्री

# लेखकांसाठी सुचना

१. लेखांचा विषय प्रचलित आणि संक्षिप्त असणे आवश्यक आहे.

२. प्रकाशित करणाऱ्या येणाऱ्या लेखांची शब्दमर्यादा ५०० ते १००० असावी आणि लेख संगणकीकृत करून shikshanyatri11@gmail.com, pragatiartsshirpur@gmail.com या मेलवर पाठवावी.

३. संगणकीकृत केलेल्या मुद्रित अक्षरांसाठी (श्रीलिपी देव ७०८) Shree lipi- Dev708 /google marathi/ mangal font फॉन्ट साईज १५ असावे.

४. स्वीकृत करण्यात येणाऱ्या लेखांचे पुनर्संस्कारित करण्याचे सर्व हक्क संपादक मंडळाकडे राहतील.

५. लेखात अद्यावत माहिताचा वापर करून भाषा सुस्पष्ट व समजण्यास सोपी असावी.

६.लेखकाने प्रथम पृथ्वावर लेखाचे शीर्षक, लेखकाचे नाव, पासपोर्ट साईज फोटो, भ्रमणध्वनी व पिनकोडसह पत्ता अवश्य द्यावा.

७. लेख पाठवितांना लेखकांकडून अनेकवेळा टंकलेखनामध्ये चुका होत असल्याचे आढळते, त्यामुळे वाक्यांचा संदर्भ लागत नाही. तरी कृपया लेख पाठवितांना पुन्हा एकदा काळजीपूर्वक वाचन करून पाठवावा.

८. मासिकाच्या वर्गणीचे धनादेश व डिमांड ड्राफ्ट - शिक्षणयात्री या नावाने संपर्क पत्त्यावर पाठवावेत.

**संपर्क** :शिक्षणयात्री शैलनंद,प्लॉट नं.५२ पार्वती कॉलनी,शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे 8208301001shikshanyatri11@gmail.com

Reg No. MAHMAR2015/67226 शिक्षणयात्री Postal Registration No.DHL/557/2021-23

## स्वातंत्र्य दिनाच्या हार्दीक शुभेच्छा...!

# दि शिरपूर मर्चन्टस् को.ऑप.बँक लि.शिरपूर

### बँकेच्या सुविधा

प्रशिक्षित व सेवाभावी कर्मचारी वृंद

संपूर्ण संगणकीकृत

वीज बिल भरणा केंद्र

तत्पर सेवा व अद्ययावत सुविधा

सभासदांसाठी मृत्यूंजय फंड योजना

सतत अ वर्ग

५०% सोलर पॉवर वापरणारी एकमेव बँक

अविरत ७१ वर्षांची अखंड सेवेची परंपरा

भारताचे रूपे नेटवर्कशी

त्वरीत सोने तारणावर कर्ज सुविधा

वातानुकुलित बँक

गुंतवणुकीत भरघोस वाढ

लॉकर्स सुविधा उपलब्ध

विविध समाजहिताचे उपक्रम

सभासदांना रू.१५०००० /- चे अपघाती विमा संरक्षण

सभासदांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा दरवर्षी गौरव

ए.टी.एम.,सी.डी.एम.,आर.टी.जी.एस.,एन.ई.एफ.टी,

संलग्न कोणत्याही बँकेच्या एटीएम मधून पैसे काढण्याची सुविधा

## सभासद व ग्राहकांचा जिव्हाळा 'आपली बँक मर्चंट बँक'

फोन (०२५६३)२५५०२५/२५५९२८/२५५०२८



मा.श्री.प्रसन्न जयराज जैन
चेअरमन

### संचालक मंडळ



मा.श्री.काशिनाथ सोमा माळी
व्हा. चेअरमन

मा.श्री. राजेंद्र शि.पंडीत
मा.श्री.नवनीत गि.राखेचा
श्री.केवलसिंग बा.राजपूत
मा.श्री. रामचंद्र उखा ठाकरे
मा.श्रीमती स्मिता व.कोठारी

मा.श्री.तुषार वि.रंधे
मा.श्री.महेश जयराम लोहार
मा.श्री.मुकेश ता.अग्रवाल
मा.श्री.विनोद शां.चावडा
मा.श्री.महेश पं.गुजराथी
(असि.मॅनेजर)

मा.श्री.मनोज ओ.अग्रवाल
मा.श्री. सहेबराव भि.महाजन
मा.श्री.किरण य.दलाल
मा.सौ पूनम रा.भंडारी
श्री.संजय के.कुलकर्णी
(असि.मॅनेजर)

Postal Registration No.DHL/557/2021-23

संपादक - शिक्षण यात्री
शैलनंद,प्लॉट नं.५२ पार्वती कॉलनी,
करवंद नाका,शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
४२५४०५

प्रती, ..................................................
..................................................
..................................................

Pragati Arts Shirpur 8421356261